# बा ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय ठाणे, येथे हिंदी दिवस उत्साहात संपन्न झाला.

बा. ना. बांदोडकरविज्ञानस्वायत्तमहाविदयालयात " हिंदी दिवसाचे" औचित्य साधून हिंदी पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले, दिनांक १४. सप्टेंबर ते 30 सप्टेंबर पर्यंत "कनिष्ठ महाविद्यालय हिंदी विभागाच्या माध्यमातून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयात राष्ट्रीय निबंध स्पर्धेचे चे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये जवळ जवळ ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, सदर स्पर्धेचा निकाल दिनांक २७ सप्टेंबर रोजी झालेल्या "हिंदी दिवस" कार्यक्रमात विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कॅप्टन प्राचार्य डॉ मोझेस कोलेट यांनी विजेते , सोनल शरद चव्हाण (प्रथम) दिव्या भारत खुने (द्वितीय) दिशा रत्नाकर पुरी (तृतीय) तसेच उत्तेजनार्थ अपेक्षा भारत डाकी, रागिणी प्रशांत भोसले, सॅम शशिकांत राय, यांचा महाविद्यालयाकडून प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मान करण्यात आला. तसेच सर्वश्रेष्ठ उद्घोषक अर्थात उत्कृष्ट निवेदक, सुत्रसंचालकाचीही निवड करण्यात आली, प्रमुख पाहुणे के.बी.कॉलेज चे प्रा. योगेश सिंह , तसेच आयडीएल कॉलेजचे प्रा. हनीफ शेख यांनी उत्कृष्ट सुत्रसंचालक कुमारी नूरी फातीमा या विद्यार्थिनीस गेल्डमेडल व प्रमाणपत्र देऊन तिचा सत्कार केला. दिनाक २७ सप्टेंबर रोजी हिंदी दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या पंतजली सभागृहात करण्यात आले होते, या वेळी ऑनलाईन लिंक द्वारे " हिंदी प्रश्न मंजुषा" परीक्षा घेण्यात आली त्यात 143 विद्यार्थी सहभाग झाले,व शिक्षकांनीही सहभाग दिला, हिंदी ही राष्ट्र भाषा असून तिचा सन्मान कोणकोणत्या क्षेत्रात केला जातो याचे जिवंत उदहरण म्हणजे 60 विदयार्थ्यी कलाकारांनी नृत्याविषकाराच्या माध्यमातून दाखवून दिलेली कलाकृती होय .

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. मोझेस कोलेट सर यांनी प्रमुख पाहुण्यांचे महाविद्यालयाचे सन्मानचिन्ह व पुस्तकरुपी भेट देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक हिंदी विभागप्रमुख प्रा. अनिल आठवले यांनी केले तर प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट सरांनी हिंदी दिवसाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सुरवात केली, ते म्हणाले भाषा हि मनापासून आली पाहिजे सर्वानी मनाची भाषा बोलली पाहिजे, अर्थात मानवाच्या भावना, संवेदना, जाणणारी भाषा बोलली आणि ओळखली पाहिजे.तरच भाषा समृद्ध होते. असे ते म्हणाले,कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले त्याच वेळी वंदनगीत कुमारी अनिष्का कदम हिने सादर केले, तसेच हर्षदा साळवे,गौरी पाल हिने पाहुण्यांचे स्वागतगीताने स्वागत करुन पाहुण्यांची मने जिंकली व प्रेक्षकांची दाद मिळविली,व त्याच बरोबर आपल्या च महाविद्यालयातील अकरावीची गानसम्राज्ञी बेटी त्या लोखंडे हिने "सत्यम शिवम सुंदरम्" गीत सादर करून करून सर्वाच्या ऋदयावर अधिराज्य गाजविले. म्हणतात ना कला ही एक निसर्गाची देन असते अशीच नृत्यविष्काराची कला हिंदी दिवसामध्ये मातृभाषेचा आदर करून मराठी नृत्याची अप्सरा अर्थात नाचे मयूरी एका पायाने अधू असून सुद्धा "चंद्रां" या मराठमोळ्या गाण्यावर उत्कृष्ट नृत्यविष्कार सादर करुण प्रेरणा सरदार हिने सर्वांची मने जिंकली. प्रचार्य व पाणहुण्यानीही तीचे भरभरून कौतुक केले पुढील अतंरमहाविद्यालयीन व राष्ट्रीय स्पर्धेत साठी तीला प्रोत्साहन व शुभेच्छाही दिल्या. विविध स्पर्धेत सहभागी होण्याची सूचनाही केली. प्रथमतः अकरावीच्या विद्यार्थ्यांनी" ढोंगी बाबा" हे नाटक सादर करून संधी साधू बाबा पासून सावध राहण्याचा संदेश दिला. रागिनी भोसले, हिंने उत्कृष्ट भाषण करून हिंदी भाषेची उंची वाढवली तर दुसरे नाटक " मस्ती की पाठशाला" मध्ये श्रीधर कलसगोंडा आणि ग्रुप यांनी आजकाल ची बिनधास्त विद्यार्थी पिढी आणि शिक्षक यांच्यातील व्यंगात्मक धम्माल विनोदी नाटिका सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले,

यानंतर कुमारी अंकिता शिंदे आणि रेशमा राठोड ग्रुप यांनी " अनेकता में एकता " या विविधतेने नटलेल्या संपूर्ण भारताचे दर्शन नृत्यविष्कारातुन सादर करून ज्या हिंदी भाषे मुळे भारतातील लोक प्रत्येक प्रदेशात हिंदी अगदी सहज बोलतात त्याची अस्मिता दाखविणारे उत्तम सादरीकरण केले, तर शास्त्रीय नृत्यविष्कारातुन आकांक्षा लोखंडे आणि ग्रुप यांनी भाषेतील समृद्धी चे दर्शन घडवून हिंदी भाषेचा उचांवनारा दर्जा सादर करून सर्वांची मने जिंकली ,

आजची पिढी थोडी आधुनिक युगातली आहे हिंदी ने जगावर आपली छाप पाडली आहे तर सृष्टी यादव आणि समुह यांनी , हम किसीसे कम नहीं, अर्थात पाश्चिमात्य कलाकृती वर अभिनयाची कला सादर करून हिंदी भाषेवर अधिराज्य दाखविले.

प्रमुख पाहुणे प्रा. योगेश सिंग (के बी पी गर्ल्स विद्यालय कोपरी ठाणे ) हे मार्गदर्शन करताना म्हणाले, भारताच्या मूळ रहिवाशांना प्राचीन काळात 'नाग' असे म्हटले जात होते. 'नागा ची लिपि 'अर्थात नागरी म्हणू लागली. संस्कृत ही देव भाषा म्हणून प्रचलित होती, म्हणून * देवनागरी * या शब्दाची निर्मिती झाली, केवळ नगरात राहणार्या. नागरिकांना नागरिक म्हटले गेले, आणि नागरिकत्व ही आपल्या भारताची सभ्यता व संस्कृतीची खास ओळख बनली. या सर्व शब्दांमध्ये 'नाग' हा प्रमुख शब्द आहे. भारत नागावंशाशी संबंधित आहे. भारताच्या कथांमध्ये आम्ही नेहमीच शेशनाग, वासुकी, अनंत, कालिया इत्यादींचा उल्लेख वाचला आहे. भारतात बरीच ठिकाणे आहेत, अजूनही नागपूर (प्राचीन सर्पांची राजधानी), अनंतनाग (जम्मू आणि काश्मीर) सारख्या भारतीयांची मूलभूत ओळख म्हणून अस्तित्वात आहेत जी नागालँड इ. आज ही आपण आपल्या देवनागरी लिपी ला जुडले गेले असून आपण तिचे संवर्धन करु शकतो. या शब्दात त्यांनी हिंदी शब्दांची ओळख करून दिली. आणि सरतेशेवटी आयोजकाचे आभार मानले कारण हिंदी दिवसाचे सुदंर आयोजन करून विद्यार्थ्यांना भाषेबद्दल असनारे प्रेम आणि भाषा कौशल्य, आदर, कलागुणांना मिळालेली दाद हि खर्या अर्थाने हिंदी ला उभारी देण्यासारखे आहे असे ते म्हणाले, तसेच आयडियल कॉलेज ठ चे प्रा. हानिफ शेख यांनी सर्वाना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा देऊन 1980 च्या दशकातले किशोर कुमार यांच्या आवाजातील सुमधुर गीत "दर्दे दिल दर्दे जिगर" हे गीत गाऊन वातावरण प्रफुल्लित केले . तसेच गणिताचे प्रा विनोदी थोरात यांनी, हिंदी मधून शेरोशायरी ची अतिशबाजी करून वातावरणात जल्लोष निर्माण केला, तर सेवानिवृत्त प्रा. प्रकाश माळी यानीही हिंदी कविता साजरी केली, उपप्राचार्या सौ. सुनिता ढाकणे, व पर्यवेक्षीका डॉ.संध्या पावले यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला,सर्व शिक्षक बांधव व शिक्षकेतर बांधवानी ही उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलजा यादव, अक्षता बनसोडे, नूरी फातिमा, अमोल चौघुले,प्रगती उखांडे, पूर्वेश तळेले, साक्षी यांनी केले, तर पूर्वेश आणि निखिल यानी फोटोग्राफी आणि व्हिडिओ साठी सहकार्य केले,साउंड टेक्निशियन अवधूत काकडे, साहिल गगनहळ्ळी,मंदार क्षीरसागर यांनी उत्तम कार्यक्रम सफल होण्यासाठी कुमारी सृष्टी यादव,शैलजा यादव, आश्लेषा भोसले, अमोल चौघुले,रेश्मा राठोड , यांनी संपूर्ण हातभार लावला, शेवटी हिंदी विभाग प्रमुख प्रा. अनिल आठवले यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले ,आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने संपन्न झाली.




विद्या प्रसारक मंडल
हिंदी विभाग
१४ सितंबर हिंदी दिवस
के अवसर पर आपका हार्दिक
स्वागत करता है।


विद्या प्रसारक मंडल
हिंदी विभाग







